माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- २२९/२०२१**

**तक्रारकर्ता श्री. शशिकांत पी. चौधरी**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त**
दिंडोशी विभाग, वर्धमान बिल्डिंग, वेस्टन एक्सप्रेस हायवे,
साईबाबा मंदिराजवळ, गोविंदनगर, मालाड (पूर्व)
मुंबई -४०० ०९७.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त (परिमंडळ-१२)**
शैलेंद्रनगर, दहिसर (पूर्व), मुंबई – ६८

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : ०९.०४.२०२६**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित (प्रतिनिधी) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित(प्रतिनिधी) |

सदर प्रकरणी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. १८.०६.२०१९ रोजी पुढीलप्रमाणे आदेशीत केले होते:-

*"अपिलार्थी यांना दि. २४.०७.२०१८ च्या अर्जाच्या अनुषंगाने अभिलेखी उपलब्ध असलेली माहिती ७ दिवसांत देण्यात यावी. अपील अंशत: मान्य करुन निकाली काढण्यात येत आहे."*

२. तक्रारकर्ता यांना उक्त आदेशाच्या अनुषंगाने माहिती मिळालेली नाही म्हणून त्यांनी आयोगाकडे दि. ०७.०८.२०१९ रोजी व्दितीय अपील सादर केले. आयोगाने सदर प्रकरणी अपील क्र. MHSICMU/२०१९/M/००३३३४ मध्ये दि. ०९.०६.२०२१ रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत :-

*"अपिलार्थी यांनी दाखल केलेला व्दितीय अपील अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम (१८) अंतर्गत तक्रार म्हणून दाखल करण्यात येत आहे."*

३. उक्त आदेशाच्या अनुषंगाने आयोगाच्या कार्यालयाने दि. २४.०५.२०२२ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, दिंडोशी विभाग, मालाड (पूर्व) मुंबई यांच्याकडून अहवाल मागितला. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, दिंडोशी विभाग, मालाड (पूर्व) मुंबई यांच्याकडून आयोगास दि. १६.०६.२०२२ रोजी अहवाल प्राप्त झालेला आहे.

४. सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता यांचे अधिवक्ता, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी यापूर्वी आयोगास सादर केलेला अहवाल दि.१६.०६.२०२२ आयोगाच्या निदर्शनास आणून नमुद केले की, तक्रारकर्ता यांनी दि. २१.०६.२०१९ रोजी

..२/-

स्वत: माहिती स्विकारलेली आहे व त्यांनी दि. २०.०६.२०१९ रोजीच्या पत्रावर तक्रारकर्ता यांनी माहिती स्विकारल्याची स्वाक्षरी असलेली नोंदही आयोगास सादर केली. तक्रारकर्ता यांचे अधिवक्ता यांनी आयोगास सादर केले की, त्यांना जन माहिती अधिकारी यांचे दि. २०.०६.२०१९ रोजीचे पत्र प्राप्त आहे. परंतु त्यांचे माहिती अर्जातील मुद्दा क्र. ४ अनुसार त्यांना अजूनही माहिती मिळालेली नाही. कारण जर त्यांच्याकडे कोणतेही कागदपत्रे उपलब्ध नव्हती तर माहिती अर्ज दिंडोशी पोलीस ठाणे कडून बोरीवली पोलीस ठाणेकडे का हस्तांतरीत करण्यात आले. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, जेव्हा एका पोलीस ठाणे विरुध्द तक्रार असेल तर संबंधीत अपर पोलीस आयुक्त यांना तसे अधिकार आहेत की, प्रकरणाचा तपास अन्य पोलीस ठाणे कडे वर्ग करु शकतात. बहुतेक सदर प्रकरण बोरीवली पोलीस ठाणेकडे त्यामुळे हस्तांतरीत केले असावे.

५. तक्रारकर्ता यांचे अधिवक्ता यांनी आयोगास सादर केले की, सदर प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाने आदेश पारित केले आहेत व त्यांना सदर माहितीची आवश्यकता राहिलेली नाही व त्यांनी सदर तक्रार अर्ज निकाली काढण्यास सहमती दर्शविली.

६. तक्रारकर्ता यांची विनंती मान्य करण्यात येत आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission
Greater Mumbai

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : १५.०४.२०२६**